क्र.का.५/मुद्रांक-११/प्र.क्र.२३/११/९२४-९३२
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
दिनांक - १४/०७/२०११.

## परिपत्रक -

सर्वांचे लक्ष मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम १८ कडे वेधण्यात येत आहे. कलम १७ मध्ये या राज्यात निष्पादित होणाऱ्या संलेखास निष्पादनापूर्वी, निष्पादनाचे वेळी अथवा निष्पादनानंतर पुढील कामकाजाचे दिवसापर्यंत मुद्रांक शुल्क, पक्षकार स्वतः म्हणजेच खाजगीरित्या भरु शकतात. याच पध्दतीने कलम १८ मध्ये परदेशांत अथवा परराज्यात निष्पादित झालेल्या संलेखाला, खाजगीरित्या मुद्रांकन करुन घेण्यासाठी, राज्यात दाखल झाल्यापासून तीन महिन्याची मुदत आहे. थोडक्यात, संबंधित आपल्या दस्तऐवजाला, उमट मुद्रांक, फ्रँकिंग, ई-स्टॅम्प इत्यादि माध्यमातून देय असलेले मुद्रांक शुल्क भरु शकतात. तथापि संबंधित संलेखाला आवश्यक असलेला विशिष्ठ प्रकारचा (स्पेशल अॅडेसिव्ह, हुंडी, फॉरिन बिल इ.) अथवा विशिष्ठ रकमेचा मुद्रांक बाजारात सहजासहजी उपलब्ध होत नसल्यास, संबंधित आपला संलेख मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेमार्फत मुद्रांकित करुन घेवू शकतात.

असा अनुभव आहे की, सद्यस्थितीत परदेशातून अथवा परराज्यातून आलेला प्रत्येक संलेख हा कलम ३१ खाली अभिनिर्णीत करुन घेणे आवश्यक आहे, अशी मानसिकता निर्माण झाली आहे, ती चूकीची आहे. यामुळे निष्कारण प्रशासनावर अभिनिर्णयाचा ताण येत असून, प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक असलेल्या इतर महत्वाच्या बाबींकडे दुर्लक्ष होत आहे. ही बाब गांभीर्याने विचारात घेणे आवश्यक आहे.

यास्तव विभागातील सर्व अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतात की, -

१) परराज्यातून अथवा परदेशातून प्राप्त प्रत्येक संलेखाचे बाबतीत कलम ३१ प्रमाणे अभिनिर्णय करुन घेण्याचा आग्रह कोणीही धरु नये.

२) परराज्यातून अथवा परदेशातून प्राप्त संलेखाचे बाबतीत निष्पादनापासून तीन महिन्याचे आत, योग्य वर्णनाचे (कायद्यात / नियमात विहीत केलेल्या वर्णनाचे) व आवश्यक तेवढया रकमेचे मुद्रांक शुल्क भरले असल्यास, तो योग्य मुद्रांकित आहे असे मानण्यात यावे व नोंदणीचे कामकाज पूर्ण करावे. अशा दस्तऐवजास अभिनिर्णय अथवा अटकाव करण्याची आवश्यकता नाही.

परंतू, नोंदणी अधिकाऱ्यासमोर आलेल्या वरील प्रकारचे संलेखांस जर योग्य वर्णनाचे मुद्रांक लावलेले नसतील किंवा अशा संलेख न्यून मुद्रांकित असेल तर नोंदणी अधिकाऱ्यांनी संबंधितांना हा संलेख मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडून मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे तरतुदीप्रमाणे प्रमाणित करुन घेण्याच्या सूचना द्याव्यात.

सर्व अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी / दुय्यम निबंधक यांच्या निदर्शनास सदर परिपत्रक आणून देवून, त्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे व सर्व सामान्य नागरिक / पक्षकार यांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच शासनाचे महसूली नुकसान होणार नाही, याचीही दक्षता घ्यावी.

सही/-XXX
(एस. चोक्कलिंगम्)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांना.
२) सर्व विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
३) सर्व सहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी
४) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे

**निर्गमित,**

**(नितीन गोसावी)**
**सह नोंदणी महानिरीक्षक तथा**
**मुद्रांक अधिक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे.**